


# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com RNI No. - MAHMAR 2023/84526

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २२१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि.२ आक्टोंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


# हिंसा हे प्रश्नांचं उत्तर नाही, लोकशाहीतूनच आमूलाग्र बदल शक्य

## सरसंघचालकांनी टोचले राजकीय पक्षांचे कान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२नागपूर**

भारतात मोठ्या काळापासून विविधता असूनदेखील समाजात एकता आहे. मात्र काही लोक जाणुनबुजून एकतेवर प्रहार करण्याचे प्रयत्न होतात. विशेषतः श्रद्धास्थाने, महापुरुष व प्रार्थनास्थळांसंबंधात अनादराच्या घटना घडतात. तसेच लहानसहान बाबींवरून किंवा संशयावरून कायदा हातात घेणे, गुंडगिरी, हिंसाचार करणे अशा गोष्टी होतात. परंतु ही पद्धत अयोग्य आहे. अशा घटना पूर्वकल्पित कल्पनेने किंवा एखाद्या विशिष्ट समुदायाला चिथावणी देण्यासाठी घडवल्या जातात. त्यांच्या जाळ्यात अडकले जाणे तात्काळ आणि दीर्घकालीन ध्येयासाठी हानिकारक आहे. हिंसा हे प्रश्नांचे उत्तर नाही, लोकशाहीतूनच आमूलाग्र बदल शक्य आहे, या शब्दांत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांनी राजकीय पक्षांसोबत समाजात भेद उत्पन्न करणाऱ्या तत्वांचे कान टोचले. नागपुरातील रेशीमबाग मैदानात संघाच्या शताब्दी वर्षातील विजयादशमी व शस्त्रपूजन उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी भारताचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, प्रांतिक संघचालक दीपक तामशेट्टीवार, सह-संघचालक श्रीधरजी गाडगे आणि महानगर संघचालक राजेश लोया हे प्रामुख्याने उपस्थित होते. आपल्या शेजारील देशांमध्ये मोठ्या प्रमाणात अशांतता आहे. श्रीलंका, बांगलादेश पाठोपाठ नेपाळमध्ये सत्तांतरास कारणीभूत ठरलेल्या जनतेचा हिंसक उद्रेक चिंताजनक आहे.अशा अशांतता निर्माण करू पाहणाऱ्या शक्ती भारतात तसेच जागतिक स्तरावर सक्रिय आहेत. परंतु हिंसक उद्रेकांमध्ये इच्छित बदल घडवून आणण्याची शक्ती नसते. केवळ लोकशाही मार्गांनीच समाज



आमूलाग्र बदल साध्य करू शकतो. हिंसक घटनांमुळे जागतिक वर्चस्ववादी शक्तींना गैरफायदा घेण्याची संधी मिळते. आपले शेजारी देश सांस्कृतिकदृष्ट्या भारताशी जोडलेले आहेत. एक प्रकारे, ते आपले कुटुंबीयच आहेत. आपल्या शेजारी देशांमध्ये आपल्या स्वतःच्या हितांचे रक्षण करण्यापेक्षा शांतता, स्थिरता, प्रगती भारताच्या समृद्धीसाठी अत्यंत आवश्यक आहे, असे सरसंघचालक म्हणाले.

कोणत्याही देशाच्या प्रगतीमध्ये सामाजिक एकता हा एक महत्त्वाचा घटक आहे. आपला देश प्राचीन काळापासून विविधतापूर्ण आहे, परंतु समाज, राष्ट्र आणि संस्कृती म्हणून आपण एक आहोत. आपल्या राष्ट्रीय एकतेची भावना सर्वसमावेशक आहे. आपण आपल्या एकतेचा पाया कधीही विसरू नये. जगाच्या समस्यांवर कायमस्वरूपी उपाय देणारी एक नवीन निर्मिती आवश्यक आहे. आपल्या समग्र आणि एकात्मिक दृष्टिकोनावर आधारित अशा निर्मितीसाठी केवळ भारतच एक अनुकरणीय आदर्श देऊ शकतो. या दृष्टिकोनासह, आपण विकासाचा मार्ग आखला पाहिजे आणि जगासमोर एक गौरवशाली उदाहरण सादर केले पाहिजे, असे प्रतिपादन सरसंघचालकांनी केले.

**ऑपरेशन सिंदूरमध्ये दिसली समाजाची एकता**

काश्मीरमधील पहलगाम हल्लयानंतर, भारतातील नागरिक दुःख आणि संतापाने भरले होते. सरकारने योग्य प्रत्युत्तर दिले. या काळात, देशाने नेतृत्वाची ताकद, आपल्या सैन्याचे शौर्य आणि समाजाची उल्लेखनीय एकता पाहिली असे सरसंघचालक म्हणाले.

**ट्रम्प टॅरिफबाबत स्वदेशी आणि स्वावलंबनाशिवाय पर्याय नाही**

अमेरिकेने स्वतःच्या हिताच्या आधारावर आयात शुल्क धोरण लागू केले आहे. यामुळे आपल्यालाही काही गोष्टींवर पुनर्विचार करावा लागेल. जग परस्परावलंबनावर चालते, परंतु आपण त्याला सक्ती न बनवता स्वावलंबी होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत. परमपूज्य सरसंघचालकांनी त्यांच्या भाषणात स्पष्टपणे सांगितले की स्वदेशी आणि स्वावलंबनातूनच स्वावलंबन मिळवता येते आणि त्याला पर्याय नाही, असे प्रतिपादन सरसंघचालकांनी केले.

**महात्मा गांधींबाबत संघमंचावर गौरवोद्गार**

यावेळी सरसंघचालकांनी महात्मा गांधी यांच्याबाबत गौरवोद्गार काढले. महात्मा गांधी आपल्या स्वातंत्र्याच्या प्रमुख शिल्पकारांपैकी एक आहेत.स्वातंत्र्योत्तर 'स्व' आधारित भारताची संकल्पना दृढ करणाऱ्या तत्वज्ञानींमध्ये त्यांचे आदराचे स्थान आहे, असे सरसंघचालक म्हणाले.

# पंकजा मुंडेंचा दसरा मेळावा

## सभास्थळी वाल्मीक कराडचा फोटो

### व्यासपीठावरून 'संडे टू मंडे गोपीनाथ मुंडे'च्या घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२बीड**

भाजपच्या नेत्या तथा राज्याच्या कॅबिनेट मंत्री पंकजा मुंडे यांच्या दसरा मेळाव्याला भगवान गडावर सुरुवात झाली आहे. या मेळाव्याला माजी खासदार प्रीतम मुंडे, रासपचे अध्यक्ष महादेव जानकर व माजी मंत्री तथा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार धनंजय मुंडे यांच्यासह अनेक लहानथोर नेते उपस्थित आहेत. या सर्वांनी 'संडे टू मंडे गोपीनाथ मुंडे' अशी घोषणा करत उपस्थित ओबीसी बांधवांत ऊर्जा भरण्याचे काम केले.

दरम्यान, सभास्थळी काही लोकांच्या हातात मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडातील प्रमुख आरोपी वाल्मीक कराड याचे फोटो झळकवला. त्यामुळे या प्रकरणी वाद उत्पन्न होण्याची शक्यता आहे.

माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी यावेळी सभेला संबोधित केले. त्यात त्यांनी पंकजा मुंडे या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना सर्वोतपरी मदत करतील असा ठाम विश्वास व्यक्त केला. काही दिवसांपूर्वी हा मेळावा होण्यासारखी परिस्थिती नव्हती. अभूतपूर्व असा पाऊस आला. शेतकऱ्यांवर भयंकर




संकट ओढवले. माझी आणि ताईची चर्चा झाली की काय करायचे? पण ताईंनी सांगितले की, काहीही झाले तरी या दसरा मेळाव्याची परंपरा मोडायची नाही. शेतकरी आज अडचणीत आला आहे. अभूतपूर्व नुकसान झाले हे मान्य करतो. आज मी मंत्रिमंडळात नाही, फक्त आमदार आहे. पण माझी बहीण मंत्रिमंडळात आहे. शेतकऱ्याला जास्तीत जास्त मदत पंकजाताई महायुतीच्या सरकारकडून मिळवून देतील, असे ते म्हणाले.

# युक्रेन युद्धानंतर पुतिन पहिल्यांदाच भारत दौऱ्यावर येणार, अनेक करारांवर स्वाक्षऱ्या होणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२नवी दिल्ली**

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन ५ डिसेंबरच्या सुमारास भारतात येण्याची शक्यता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत होणाऱ्या वार्षिक शिखर परिषदेत द्विपक्षीय संबंधांना नव्या टप्प्यावर नेणारे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय होण्याची शक्यता आहे, अशी माहिती अधिकृत सूत्रांनी बुधवारी दिली.



या महत्त्वाच्या दौऱ्यासाठी तयारी सुरू असून पुतिन एका दिवसासाठी येणार की दोन दिवसांसाठी येणार, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. दौऱ्याचे सविस्तर तपशील निश्चित करण्यासाठी रशियाचे परराष्ट्रमंत्री सर्गेई लाव्हरोव नोव्हेंबरमध्ये भारतात येणार आहेत.

अध्यक्ष पुतिन यापूर्वी २०२१ मध्ये नवी दिल्लीला आले होते. यावेळी शिखर परिषदेसोबत भारत-रशिया आंतरसरकारी लष्करी व तांत्रिक सहकार्य आयोगाची बैठक होण्याचीही शक्यता आहे.

२०१८ मध्ये भारताने ५ अब्ज डॉलर्सचा करार करून रशियाकडून पाच एस-४०० हवाई संरक्षक क्षेपणास्त्र प्रणाली विकत घेतली होती.यापैकी तीनचा पुरवठा झालेला असून उर्वरित दोन युनिट्सचा पुरवठा २०२६ मध्ये होणार आहे. युक्रेन युद्धामुळे वेळापत्रक पुढे ढकलले गेले.

**शिखर परिषद अजेंडा**

धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ करणे, संरक्षण, व्यापार, ऊर्जा आणि सुरक्षेतील सहकार वाढवणे, युक्रेन संघर्षासंबंधी चर्चा, आंतरराष्ट्रीय संदर्भ.

चीनमधील तियानजिन येथे झालेल्या शांघाय सहकार संघटनेच्या परिषदेच्या निमित्ताने मोदी-पुतिन यांची भेट झाली. अमेरिकेकडून भारतीय वस्तूंवरील आयात शुल्क दुपटीने वाढवले गेले असतानाच्या पार्श्वभूमीवर ही चर्चा झाली. मोदी यांनी या बैठकीत पुतिन यांना, भारताचे १४० कोटी नागरिक डिसेंबरमधील तुमच्या भारतदौ-याची उत्सुकतेने वाट पाहत आहेत, असे सांगत स्वागत केले होते. त्यांनी असेही नमूद केले की, भारत-रशिया संबंध दोन्ही देशांसाठीच नव्हे तर जागतिक शांतता व स्थैर्यासाठीही महत्त्वाचे आहेत.

# डॉ. हेडगेवार आणि बाबासाहेबांच्या विचारांमध्ये आश्चर्यकारक साम्य

## आरएसएसच्या विजयादशमी उत्सवात रामनाथ कोविंद यांचे वक्तव्य

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२नागपूर**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमी उत्सवाला माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले. संघाच्या शताब्दी स्थापना दिनानिमित्त त्यांचे व्यासपीठावर आगमन हे फक्त औपचारिकतेपुरते मर्यादित नव्हते, तर त्यातून एक मोठा सामाजिक व राजकीय संदेश देण्यात आला. नागपूरात दाखल झाल्यानंतर त्यांनी प्रथम दीक्षाभूमीला भेट देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले. १९५६ मध्ये डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारलेली हीच ती ऐतिहासिक भूमी. कोविंद यांनी या ठिकाणी प्रार्थना करून नंतर आरएसएसच्या कार्यक्रमाला उपस्थिती लावली. आपल्या भाषणात त्यांनी आंबेडकर, हेडगेवार, संत तुकाराम, संत रविदास, बिरसा मुंडा आदी समाजसुधारक आणि दलित-महात्म्यांचा उल्लेख करत एकात्मतेचा संदेश दिला.



रामनाथ कोविंद यांनी व्यासपीठावरून सर्वांत जास्त भर दिला तो म्हणजे जातिवाद आणि छुआछूत नसलेला संघ यावर. गेल्या काही वर्षांत विरोधकांकडून संघ आणि भाजपवर 'दलित विरोधी' असल्याचे आरोप सातत्याने केले जात होते. विशेषतः २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत याचा तोटा भाजपला बसल्याचे राजकीय समीक्षकांचे म्हणणे आहे. अशा पार्श्वभूमीवर माजी राष्ट्रपती व देशातील सर्वांत मोठ्या दलित नेत्यांपैकी एक असलेल्या रामनाथ कोविंद यांची उपस्थिती हा एक प्रकारे प्रतिउत्तर मानले जात आहे. त्यांनी आपल्या भाषणात संघाने कधीही जातिवादाला खतपाणी घातले नाही, उलट सर्व समाजघटकांना एकत्र आणण्याचे कार्य केले आहे, असा ठाम दावा केला. संघात ऊंच-नीच नाही, छुआछूत नाही. येथे सर्व एकसमान आहेत, असे ते म्हणाले.

# दसऱ्याची सुवर्णभेट सुवर्णकार-पोलीस समिती गठीत, मुख्यमंत्र्यांचा पुढाकार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२वर्धा**

सोनार व्यावसायिकांना अडअडचणी व समस्यांची सोडवणूक तसेच अनेक प्रकरणात पोलिसांकडून होणा-या कार्रवाई दरम्यान उद्भविणा-या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या पुढाकरातून राज्य व जिल्हा स्तरावर दक्षता समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या समितीत पोलिस अधिका-यांसह सोनार व्यावसायिकांचा समावेश करण्यात आला आहे.

सोनार व्यायसायिकांना व्यवसाय करताना अनेक अडचणी निर्माण होत होत्या. पोलिसांकडून कार्रवाईच्या नावावर सोनार व्यावसायिकांची गळचेपी करण्यात येत असल्याचा आरोप सातत्याने होत होता. त्यामुळे अनेक सोनार व्यावसायिक व पोलीस आमने सामने आल्याच्या घटना राज्यात घडल्या.पोलीस कारवाईच्या विरोधात अनेकदा सोनारांनी आंदोलनाची भूमिका घेतली



होती. सोनार व्यावसायिक व पोलिस यांच्यात समन्वय असावा, यासाठी समिती स्थापन करण्याची मागणी होत होती. मुख्यमंत्री फडणवीस यांच्यापुढे डॉ. भोयर यांनी ही बाब उपस्थित केली हाती.गृह राज्यमंत्री असलेल्या डॉ. भोयर यांनी पुढाकार घेत सुवर्णकार संघटनेशी चर्चा केली. अखेर सोनार व्यावसायिक व पोलिस यांच्यात समन्वय स्थापन करण्यासाठी राज्यस्तर, पोलिस आयुक्तालय व जिल्हा स्तरावर समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सोनार व्यावसायिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी गृह विभागाने राज्यस्तरीय दक्षता समिती स्थापन केली आहे. या समितीचे अध्यक्ष विशेष पोलिस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) हे राहणार.सदस्य म्हणून पोलिस महासंचालकांचे विधी सल्लागार, सदस्य सचिव म्हणून पोलिस अधीक्षक राज्य पोलिस नियंत्रण कक्ष हे असतील.

सदस्य म्हणून नितीन खंडेलवाल,शैलेश खराटे-अकोला, राजेश रोकडे-नागपूर,सुधाकर टांक,किरण अंदिलकर - पुणे, महावीर गांधी,गिरीष देवरमनी - सोलापूर,भरत ओसवाल-कोल्हापूर, सुभाष वडाला, अजीत पेंडूरकर - मुंबई, राजेंद्र दिंडोरकर - नाशिक व अमोल ढोमणे - वर्धा यांचा समावेश करण्यात आला आहे.

सोनार समाजाला व्यवसाय करताना नेहमीच पोलिस कार्रवाईच्या दडपणाखाली राहावे लागते होते. अनेकदा पोलिस कार्रवाई दरम्यान सोनारांची गळचेपी होत होती. नाहक सोनार समाजाला गोवल्या जात असल्याची भावना वाढत होती. ही समिती केवळ भारतात अस्तित्वात आली आहे. या समितीमध्ये सोनार समाजाचा समावेश असल्याने त्यांच्या समस्या व उडचणींचा सोडवणूक होणार आहे. समाजाच्यावतीने मुख्यमंत्री फडणवीस व गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांचे संघटनेने आभार मानले आहे.

समिती सदस्य व प्रसिद्ध एमटीडी ज्वेलर्सचे संचालक अमोल ढोमणे म्हणतात की आम्हा व्यावसायिकांना अनेक वर्षांपासून पोलिस कारवाईला सामोरे जावे लागण्याची आपत्ती असते.वर्धेतदेखील अशा कारवाईमुळे सराफा व्यावसायिकाला जीव गमवावा लागला होता. पण आता दक्षता समिती स्थापना करण्याचा निर्णय झाल्यामुळे आमच्या अडीअडचणी व समस्यांची सोडवणूक होणार असून पोलिस कारवाईच्या संदर्भात काही नियम व निकष तयार होईल. त्यामुळे पोलिस व सराफा व्यावसायिक यांच्यात समन्वय वाढेल व दोघांना त्रास होणार नाही.मुख्यमंत्री फडणवीस व वर्धेचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दस-याच्या पर्वावर समाजाला मोठी भेट दिली आहे.




## संपादकीय ......

# राष्ट्र साधनेची १०० वर्षे..!

शंभर वर्षांपूर्वी विजयादशमीच्या पवित्र मुहूर्तावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली. जेथे राष्ट्र भावना वेळोवेळी त्या काळातील आव्हानांचा सामना करण्यासाठी नवनव्या स्वरूपांमध्ये प्रकट होते, त्या हजारो वर्षांपासून चालत आलेल्या परंपरेची ही पुनर्स्थापना होती. या युगात संघ त्याच अनादि राष्ट्र भावनेचा पुण्यावतार आहे. संघाच्या शताब्दी वर्षासारखा उज्ज्वल प्रसंग पाहायला मिळतो आहे, हे या पिढीतील स्वयंसेवकांचे भाग्यच आहे.

मी यानिमित्ताने देशसेवेच्या निश्चयाला वाहून घेतलेल्या कोट्यवधी स्वयंसेवकांना शुभेच्छा देतो. तसेच मी संघाचे संस्थापक आणि सर्वांचे आदर्श असलेले परम पूजनीय डॉ. हेडगेवार यांच्या चरणी आदरालंजी अर्पण करतो. संघाच्या या शतकभराच्या गौरवपूर्ण प्रवासाची आठवण म्हणून भारत सरकारने विशेष टपाल तिकीट आणि नाणीही जारी केली आहेत. ज्या पद्धतीने विशाल नद्यांच्या किनार्यांवर मानवी संस्कृतीची जोपासना होते, त्याच पद्धतीने संघाच्या आधारानेही शेकडो आयुष्ये फुलली-फळली आहेत. ज्याप्रमाणे एक नदी ज्या ज्या मार्गांवरून वाहते त्या क्षेत्रांना स्वतःच्या पाण्याने समृद्ध करत जाते, त्याच पद्धतीने संघाने या देशातील प्रत्येक भागाला, समाजाच्या प्रत्येक पैलूला स्पर्श केला. जशी एक नदी अनेक प्रवाहांतून स्वतःचे रूप दाखवते, संघाची वाटचालही तशीच आहे. संघाच्या वेगवेगळ्या संस्थासुद्धा जीवनाच्या प्रत्येक पैलूशी स्वतःला जोडून घेऊन देशाची सेवा करतात. समाजातील शिक्षण, कृषी, समाज कल्याण, आदिवासी कल्याण आणि महिला सक्षमीकरण अशा अनेक क्षेत्रांमध्ये संघ अविरतपणे कार्य करत आला आहे. विविध क्षेत्रांमध्ये काम करणार्या प्रत्येक संस्थेचा उद्देश एकच आहे, भावनाही एकच आहे आणि ती म्हणजे, देश सर्वप्रथम!

स्थापनेपासूनच संघाने देश घडवण्याचे प्रचंड उद्दिष्ट निश्चित कन वाटचाल केली आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संघाने व्यक्तीच्या घडणीतून राष्ट्र उभारणीचा मार्ग निवडला आणि आणि या मार्गावरून वाटचाल करण्यासाठी जी कामाची पद्धत निवडली ती म्हणजे नित्यनेमाने शाखा भरवणे. संघाच्या शाखेचे मैदान, ही अशी एक प्रेरणादायक भूमी आहे जेथून प्रत्येक स्वयंसेवकाचा 'अहम्पासून वयम्'च्या दिशेने प्रवास सुरू होतो. संघाच्या या शाखा म्हणजे व्यक्तिमत्त्व घडवणार्या यज्ञ वेदी आहेत. देश उभारणीचा महान उद्देश, व्यक्ती घडवण्याचा सुस्पष्ट मार्ग आणि शाखेसारखी सोपी, सजीव कार्यपद्धत हेच घटक संघाच्या शंभर वर्षांच्या वाटचालीचा आधारस्तंभ बनले. याच स्तंभांवर पाय घट्ट रोवून संघाने लाखो स्वयंसेवक घडवले आणि आज ते विविध क्षेत्रांमध्ये देशाला पुढे घेऊन जात आहेत. संघ जेव्हापासून अस्तित्वात आला, तेव्हापासून संघासाठी देश हेच प्राधान्य राहिले आहे, त्यासाठी तुरुंगवासही भोगला. स्वातंत्र्यलढ्यात संघाने असंख्य स्वातंत्र्यसैनिकांचे रक्षण केले आहे, त्यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून काम केले. स्वातंत्र्यानंतरही संघ राष्ट्रसाधनेत अखंड झटत राहिला. या प्रवासादरम्यान संघाविरुद्ध कट-कारस्थाने रचली, संघाला नामशेष करण्याचे प्रयत्न झाले. ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्व असलेल्या परमपूज्य गुरुजींना खोट्या खटल्यात अडकवले; पण संघाच्या स्वयंसेवकांनी कधीही कटुता येऊ दिली नाही. कारण, त्यांना माहीत आहे की, आपण समाजापासून वेगळे नाही, समाज आपल्यापासून तर बनलेला आहे. समाजाशी एकरूपता आणि घटनात्मक संस्थांवरील विश्वासामुळे संघाचे स्वयंसेवक प्रत्येक संकटात स्थितप्रज्ञ राहिले, समाजाप्रति संवेदनशील राहिले आहेत.

सुरुवातीपासूनच संघ देशभक्ती आणि सेवेचा पर्याय राहिला आहे. फाळणीच्या वेदनेमुळे लाखो कुटुंबे बेघर झाली तेव्हा स्वयंसेवकांनी निर्वासितांची सेवा केली. प्रत्येक आपत्तीमध्ये संघाचे स्वयंसेवक मर्यादित साधनसंपत्तीसह सर्वात पुढे उभे राहिले. ही केवळ मदत नव्हती, तर ते राष्ट्राच्या आत्म्याला बळकटी देण्याचे कार्य होते. स्वतः त्रास सोसून इतरांचे दुःख निवारण करणे, ही प्रत्येक स्वयंसेवकाची ओळख आहे. आजही नैसर्गिक आपत्तीच्या वेळी प्रत्येक ठिकाणी स्वयंसेवक सर्वात आधी पोहोचणार्यांपैकी एक असतात.

# रब्बी मका लागवड तंत्र; जाणून घ्या अधिक उत्पादन देणारे फायद्याचे तंत्रज्ञान

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक** – राज्याच्या पातळीवर पाहता, यंदाच्या रब्बी हंगामात मका लागवडीचे क्षेत्र लक्षणीयरीत्या वाढले असून, ते २.५८ लाख हेक्टरवरून थेट ४.८४ लाख हेक्टरपर्यंत पोहोचले आहे. ही वाढ मुख्यतः केंद्र सरकारने इथेनॉल निर्मितीसाठी केलेल्या धोरणात्मक उपाययोजना, तसेच पशुखाद्य, कुक्कुटपालन खाद्य आणि चाऱ्याच्या वाढत्या मागणीमुळे झाली आहे.




यासोबतच मक्याच्या बाजारभावातील स्थिरतेनेही शेतकऱ्यांमध्ये विश्वास निर्माण केला असून, त्यामुळे रब्बी हंगामात लागवडीस उत्साहाने प्रतिसाद मिळाल्याचे चित्र दिसून येत आहे.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**हवामान व जमीन**– मका हे उष्ण, समशीतोष्ण आणि थंड अशा सर्व हवामानात येणारे पीक आहे. मक्यासाठी मध्यम ते भारी, खोल, उत्तम निचरा असणारी, भरपूर प्रमाणात सेंद्रिय पदार्थ असणारी व जलधारण क्षमता अधिक असलेली जमीन चांगली असते.

**पूर्वमशागत**– लागवडीसाठी निवडलेली जमीन तण आणि पूर्वी घेतलेल्या पिकांच्या अवशेषांपासून मुक्त असावी. जमिनीची खोल (१५ ते २० सें.मी.) नांगरट करावी. कुळवाच्या २-३ पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. शेणखत हेक्टरी १० ते १२ टन टाकावे. हिरवळीचे खत जमिनीत गाडले असल्यास शेणखताची आवश्यकता भासत नाही.

**पेरणी**– रब्बी हंगामात १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबरपर्यंत पेरणी करावी. एखादा-दुसरा आठवडा पेरणीस उशीर झाल्याने उत्पादनात फारसा फरक पडत नाही. रब्बी हंगामात मका पिकाची लागवड सरी वरंबा पद्धतीने करावी. ३-४ से.मी. खोलीवर बियाणे पेरावे.

**पेरणीचे अंतर व बियाणे प्रमाण**– सरी वरंबा पद्धतीत मका पिकाची पेरणी टोकण पद्धतीने करावी. पट्टा पद्धतीने पेरणी केल्यास उत्पन्न वाढ आढळून आले आहे. उशिरा येणाऱ्या आणि मध्यम जातींसाठी ७५ सें.मी. ×२० सें.मी. अंतरावर टोकण करावे. लवकर पक्व होणाऱ्या जातींसाठी ६० सें.मी. ×२० सें.मी. अंतरावर टोकण करावे. बियाणे प्रमाण १५ ते २० किलो/हेक्टरी. **मका पिकाचे वाण व वैशिष्ट्ये** १) मांजरी – ९०-११० दिवस; संमिश्र वाण; उत्पन्न ४० ते ५० क्विंटल/हे.; नारंगी, पिवळे दाणे. २) राजर्षी – १००-११० दिवस; संकरित वाण; उत्पन्न ५५ ते ६० क्विंटल/हे. ३) डेक्कन १०५ – १००-११० दिवस; संकरित वाण; उत्पन्न ५५ ते ६० क्विंटल/हे. ४) करवीर – १००-११० दिवस; संमिश्र वाण; उत्पन्न ४० ते ५० क्विंटल/हे.; नारंगी, पिवळे दाणे. ५) आफ्रिकन टॉल – संमिश्र वाण (चाऱ्यासाठी सर्वोत्तम); उत्पन्न ६० ते ७० टन हिरवा चारा/हे. आणि धान्य ५० ते ५५ क्विंटल/हे.


शेतकरी ते थेट ग्राहक

**कामधेनु नॅचरल्स**

उत्तम आहार सर्वोत्तम जीवन

विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी

समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती

नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०


**बीजप्रक्रिया**– करपा रोगाच्या नियंत्रणासाठी पेरणीपूर्वी २ ते २.५ ग्रॅम थायरम बुरशीनाशक प्रति किलो बियाण्यास लावावे. तसेच अॅझोटोबॅक्टर जीवाणू संवर्धन २५ ग्रॅम किंवा १०० मि.ली. प्रति किलो बियाण्यास लावून नंतर पेरणी करावी.

**खत व्यवस्थापन**– रब्बी मका पिकाची जोमदार वाढ होण्यासाठी पेरणीच्या वेळी हेक्टरी ४० किलो नत्र, ६० किलो स्फुरद व ४० किलो पालाश द्यावे. पेरणीनंतर ३० दिवसांनी ४० किलो नत्र द्यावे. तसेच पेरणीनंतर ४५ दिवसांनी उर्वरित ४० किलो नत्र द्यावे.

**पाणी व्यवस्थापन**– मका पिकाच्या महत्त्वाच्या अवस्थांमध्ये पाण्याचा ताण पडल्यास उत्पादनात लक्षणीय घट येऊ शकते, म्हणून महत्त्वाच्या अवस्थांमध्ये पाणी देणे आवश्यक असते.

पेरणीनंतर लगेच पाणी द्यावे.

पेरणीनंतर २० ते ४० दिवसांनी (पिकाची शाकीय अवस्था) पेरणीनंतर ४० ते ६० दिवसांनी (पिक फुलोऱ्यात असताना) दाणे भरण्याच्या वेळी (७५-८० दिवसांनी) रब्बी हंगामात जमिनीच्या मगदुरानुसार १०-१२ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. रब्बी हंगामात ठिबक सिंचनाचा वापर करून मका लागवड करता येते, ज्यासाठी योग्य जमीन, हवामान आणि वाणाची निवड आवश्यक आहे. ठिबक सिंचनामुळे पाण्याचा कार्यक्षम वापर होतो. खते दिल्यावरही त्याचा उपयोग होतो. ठिबकवर लागवड करताना ४ फूट किंवा ५ फूट अंतरावर नळी असेल तर नळीच्या दोन्ही बाजूला साधारणतः ८ ते ९ इंच अंतरावर लागवड करावी. दोन रोपांतील अंतर १० इंच ठेवावे.

**आंतरमशागत**– पेरणी संपताच चांगल्या वाफशावर तण नियंत्रणासाठी अॅट्रटॉप ५०% प्रवाही २ ते २.५ किलो प्रति हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून सम प्रमाणात जमिनीवर फवारावे. तणनाशक फवारणीनंतर १५ ते २० दिवसांपर्यंत आंतरमशागत करू नये.

**पीक संरक्षण अ. किड नियंत्रण** १) खोडकिडा नियंत्रण – ईमिडाक्लोप्रिड १ मि.ली./लिटर पाण्यातून फवारावे किंवा कार्बारील भुकटी (८५%) १७०० ग्रॅम/हे. ५०० लिटर पाण्यातून फवारावी. २) गुलाबी अळी – ट्रायकोडर्मा चीलोनिस या परोपजीवीचे अंडी असलेले ८ कार्ड प्रति हेक्टरी लावावेत. ३) मावा व तुडतुडे – डायमिथोएट १ मि.ली./लिटर पाण्यातून फवारावे.

४) हिरवे कणसे पोखणाऱ्या अळ्या – मिथिल पॅराथीऑनची भुकटी २० ते ३० किलो/हे. धुरळावी.

# रामकथांची मोहिनी



प्रभू श्रीराम हे केवळ देवता म्हणून नव्हे, तर मर्यादा, धर्मपालन, आदर्श, कर्तव्यनिष्ठा यांचे प्रतीक मानले जातात आणि त्यांना भारतीय समाजात विशेष स्थान आहे. त्यामुळेच सिनेमाच्या आरंभीच्या काळापासून आजपर्यंत जवळजवळ प्रत्येक दशकात रामायणावर आधारित चित्रपट किंवा दूरदर्शन मालिका प्रेक्षकांसमोर आली आणि लोकांनी त्याचे भरभरून स्वागत केले. आज पुन्हा एकदा ही कथा आधुनिक रूपड्यात प्रेक्षकांसमोर येत आहे.

हिंदी सिनेमा हा केवळ मनोरंजनाचे साधन नाही, तर तो भारतीय समाजाच्या सांस्कृतिक जडणघडणीचाही एक महत्त्वाचा घटक आहे. गेल्या सव्वाशे वर्षांच्या या प्रवासात अनेक विषय, कथानके, व्यक्तिरेखा पडद्यावर आल्या; पण त्यात सर्वाधिक लोकप्रिय ठरलेले विषय म्हणजे रामायण व महाभारतासारख्या पौराणिक कथा. यातही रामकथा ही प्रेक्षकांच्या भावविश्वात खोलवर रुजलेली कथा आहे. कारण, प्रभू श्रीराम हे केवळ देवता म्हणून नव्हे, तर मर्यादा, धर्मपालन, आदर्श, कर्तव्यनिष्ठा यांचे प्रतीक मानले जातात आणि त्यांना भारतीय समाजात विशेष स्थान आहे. त्यामुळेच सिनेमाच्या आरंभीच्या काळापासून आजपर्यंत जवळजवळ प्रत्येक दशकात रामायणावर आधारित चित्रपट किंवा दूरदर्शन मालिका प्रेक्षकांसमोर आली आणि लोकांनी त्याचे भरभरून स्वागत केले.

दादासाहेब फाळके यांनी १९१३ मध्ये 'राजा हरिश्चंद्र' चित्रपट तयार केल्यानंतर त्यांनी निवडलेला विषय होता 'लंका दहन' (१९१७). हीच रामकथेला पडद्यावर आणणारी पहिली मोठी कलाकृती ठरली. आवाज नसलेल्या त्या मूकपटांच्या काळातही या चित्रपटाने प्रचंड लोकप्रियता मिळवली. मुंबईतील चित्रपटगृहांबाहेर हा चित्रपट पाहण्यासाठी गर्दी उसळली होती. लंका दहनमध्ये अण्णा साळुंके यांनी राम व सीता ही दोन्ही पात्रे साकारली. म्हणजेच भारतीय सिनेमाच्या इतिहासातील पहिले डबल रोल या चित्रपटात झाले. त्या काळात स्त्रियांची भूमिका पुरुषच साकारत असत, याचे हे उदाहरण ठरते.

रामायणासारख्या पौराणिक कथा पडद्यावर आणणे ही दिग्दर्शकांसाठी एक प्रकारची दिव्य जबाबदारी होती. कारण, या कथा लोकांच्या श्रद्धेच्या केंद्रस्थानी आहेत आणि त्याबद्दल समाजात संवेदनशीलता आहे. दादासाहेब फाळके यांना 'द लाईफ ऑफ क्राईस्ट' हा परदेशी चित्रपट पाहून जेव्हा प्रेरणा मिळाली, तेव्हा त्यांच्या डोळ्यांसमोर भारतीय देवतांची रूपे उभी राहिली. येशू ख्रिस्तांचे चमत्कार पडद्यावर दाखवले जात असतील, तर राम-कृष्णासारख्या भारतीय देवतांच्या कथा का नाही, असा विचार करून त्यांनी आपला प्रवास सुरू केला.

१९२० मध्ये जी. व्ही. साने यांनी रामजन्म या चित्रपटातून या परंपरेला पुढे नेले. १९३२ मध्ये व्ही. शांताराम यांनी 'अयोध्येचा राजा' आणला. १९४२ मध्ये विजय भट्ट यांच्या भरत मिलाप व १९४३ मध्ये आलेल्या 'रामराज्य'ने प्रेक्षकांच्या मनात रामकथेची गोडी आणखी घट्ट केली. 'राम राज्य'मध्ये प्रभू रामांची भूमिका प्रेम अदीब यांनी केली होती. त्यांच्या छायाचित्रांवर लोक पुष्पमाला चढवून पूजेसाठी ठेवत असत. म्हणजेच पडद्यावरील कलाकार थेट देवतेच्या रूपात पूजले जाऊ लागले.

१९६१ मध्ये बाबुभाई मिस्त्री यांनी बनवलेला 'संपूर्ण रामायण' हा चित्रपट रामकथेच्या चित्रपट प्रवासातील पुढचा महत्त्वाचा टप्पा ठरला. या चित्रपटात रावण व हनुमानाला आकाशात उडताना दाखवण्यात आले, तर राम-रावण युद्धाचे दृश्य विशेष परिणामांसह उभे केले गेले. त्या काळातली तांत्रिक साधने मर्यादित असूनही प्रेक्षकांना या नव्या दृश्यभाषेने मोहित केले.

या चित्रपटात बी. एम. व्यास यांनी रावणाची भूमिका साकारली होती. नंतरच्या दशकातही रामकथा वेगवेगळ्या दिग्दर्शकांनी पडद्यावर आणली.१९८० आणि १९९० च्या दशकात दूरदर्शनवर रामानंद सागर यांनी साकारलेली 'रामायण' ही मालिका एक प्रकारची सांस्कृतिक चळवळ ठरली. घरोघरी फारसे दूरदर्शन संच नसलेल्या त्या काळात रविवार सकाळी मालिका सुरू झाली की, रस्ते ओस पडत असत. त्या मालिकेत अरुण गोविल यांनी रामाची भूमिका इतक्या प्रभावीपणे साकारली की, देशभरात त्यांना प्रत्यक्षात राम मानले जाऊ लागले. त्याच मालिकेत दीपिका चिखलिया सीता, सुनील लहरी लक्ष्मण आणि अरविंद त्रिवेदी रावण या भूमिकांत लोकप्रिय झाले. मालिकेच्या प्रसारणानंतर त्यांच्या छायाचित्रांनाही लोक देवघरात स्थान देऊ लागले होते. इतक्या मोठ्या प्रमाणावर एखाद्या मालिकेने समाजावर परिणाम घडवणे, हे अनोखेच होते. याच काळात दक्षिणेकडील सिनेमातही रामायणाच्या विविध आवृत्त्या आल्या.

तेलुगू भाषेत, तर सर्वाधिक चित्रपट रामकथेशी संबंधित आहेत. एकुणात, भारतीय चित्रपटसृष्टीत आजवर ५० पेक्षा अधिक चित्रपट आणि १८ दूरदर्शन मालिका रामायणावर आधारित बनल्या आहेत. म्हणजेच प्रत्येक पिढीने आपल्या काळात रामकथेची नवी आवृत्ती पडद्यावर पाहिली आहे.आज पुन्हा एकदा ही कथा आधुनिक रूपड्यात प्रेक्षकांसमोर येत आहे. नितेश तिवारी दिग्दर्शित रामायण हा ४००० कोटी रुपयांचा प्रकल्प याच परंपरेला नव्या भव्यतेने पुढे नेतो आहे. रणबीर कपूर 'राम', यश 'रावण' आणि सनी देओल 'हनुमान' या भूमिकांत दिसणार आहेत. या चित्रपटाचा पहिला भाग २०२६ मध्ये प्रदर्शित होणार असून त्यानंतर दुसरा भाग येईल. या दोन्ही भागांना मिळून ८००० कोटींची कमाई करावी लागणार आहे, तेव्हाच ते हिट मानले जाईल. भारतातीलच नव्हे, तर जगातील सर्वात महागड्या चित्रपटांपैकी एक म्हणून त्याची चर्चा सुरू आहे.

यात गंमत अशी की, कथानक कुणालाही नवीन नाही. देशातील जवळपास सर्वच बालके राम-रावण युद्धाची गोष्ट ऐकूनच मोठी होतात. मग, इतक्या मोठ्या बजेटमध्ये ती कथा पुन्हा का सादर केली जात आहे? याचे उत्तर म्हणजे, श्रद्धा आणि सांस्कृतिक प्रभाव व आकर्षण.

प्रभू श्रीराम हे भारतीय समाजाच्या चेतनेचे प्रतीक आहेत. धर्म, नैतिकता, कर्तव्यपालन यांचा मूर्तिमंत आदर्श म्हणून त्यांची पूजा केली जाते. त्यामुळे काळ बदलला, तंत्रज्ञान बदलले, दिग्दर्शक बदलले, तरीही प्रेक्षकांचा उत्साह मात्र तसाच टिकून आहे. १९१७ मध्ये 'लंका दहन' पाहायला लोक रांगेत उभे राहिले होते. १९८७ मध्ये 'रामायण' मालिकेसाठी रस्ते ओस पडले होते आणि आता २०२६ मध्ये लोक आधुनिक तंत्रज्ञानात रंगवलेली तीच कथा मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी उत्सुक आहेत. म्हणजेच शतक उलटलं, तरी रामाची कथा अजूनही तितकीच जिवंत आहे.




## लठ्ठपणा ते हाय बीपी! हेल्दी डाएटच्या 'या' आयडियाज तुमच्यासाठीच

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक**

नुकताच जागतिक हृदय दिन साजरा केला जात आहे. या दिवसाचे मुख्य उद्दिष्ट लोकांना हृदयविकारांपासून वाचण्यासाठी जागरूक करणे हे आहे. हृदय हा आपल्या शरीराचा सर्वात महत्त्वाचा पंप आहे आणि त्याचे आरोग्य पूर्णपणे आपल्या आहारावर अवलंबून असते.




आरोग्य तज्ज्ञांच्या मते, संतुलित आणि हृदयासाठी अनुकूल आहार घेतल्यास उच्च रक्तदाब , उच्च कोलेस्टेरॉल आणि लठ्ठपणा यांसारख्या हृदयविकारांना आमंत्रण देणाऱ्या प्रमुख समस्यांवर नियंत्रण ठेवता येते. निरोगी हृदयासाठी आपल्या रोजच्या आहारात कोणते बदल करावे आणि काय खावे, याबद्दल माहिती घेऊया.

हृदयाचे आरोग्य जपण्यासाठी खालील 'सुपरफूड्स' तुमच्या आहारात नक्की समाविष्ट करा:

**१. फायबरयुक्त अन्न**

ओट्स आणि बार्ली: यामध्ये विरघळणारे फायबर भरपूर असते, जे शरीरातील डऊ्‌ (बॅड) कोलेस्टेरॉल कमी करण्यास मदत करते.

संपूर्ण धान्य : गहू, तपकिरी तांदूळ आणि बाजरी यांसारख्या धान्यांमध्ये फायबर आणि व्हिटॅमिन बी असते, जे रक्तवाहिन्यांचे आरोग्य जपतात.

**२. हिरव्या पालेभाज्या आणि फळे**

**पालेभाज्या:** पालक आणि ब्रोकोली यांमध्ये व्हिटॅमिन के आणि नायट्रेट्स असतात, जे रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास आणि रक्तवाहिन्यांची कार्यक्षमता सुधारण्यास मदत करतात.

बेरीज स्ट्रॉबेरी, ब्लूबेरी यांसारख्या फळांमध्ये अँथोसायनिन्स नावाचे अँटिऑक्सिडंट्स असतात, जे हृदयविकाराचा धोका कमी करतात.

केळी: यात पोटॅशियम जास्त असते, जे सोडियमचे प्रमाण नियंत्रित ठेवून रक्तदाब सामान्य ठेवण्यास मदत करते.

**३. हेल्दी फॅट्स आणि नट्स**

ओमेगा-३ फॅटी ॲसिडस्: हे हृदयासाठी सर्वोत्तम फॅट्स आहेत. हे रक्त गोठण्यास (उश्रींळपस) प्रतिबंध करतात आणि ट्रायग्लिसराइड्स कमी करतात. यासाठी मासे (ऋळीह) - उदा. सॅल्मन, अक्रोड आणि जवसाच्या बिया खा.

**ऑलिव्ह तेल :** स्वयंपाकासाठी या हेल्दी तेलाचा वापर करा.



# सामाजिक न्याय कार्यालयात ज्येष्ठ नागरिक दिन साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती–** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर गौरव अभियान अंतर्गत सामाजिक न्याय विभागातर्फे आज ज्येष्ठ नागरिक दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने २०० हून अधिक ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली, तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पश्चिम विदर्भ प्रादेशिक विभाग ज्येष्ठ नागरिक महासंघाचे अध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम गावंडे, ज्येष्ठ नागरिक महासंघाचे अध्यक्ष डॉ. दामोदर पवार, संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष वासुदेव उमाळे, संत गाडगेबाबा अध्यासनचे अध्यक्ष डॉ. दिलीप काळे, प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभागाचे वित्त व लेखा सहायक संचालक डॉ. दिनेश मेटकर, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त राजेंद्र जाधवर, समाज कल्याण विभाग विशेष अधिकारी सचिन मोरे उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी ज्येष्ठ नागरिक मंडळ पूरग्रस्तांच्या मदतीसाठी २१ लाख रूपयांचा निधी गोळा करणार आहे.

तसेच विविध सामाजिक कार्यात अग्रेसर असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. सध्याच्या परिस्थितीकडे ज्येष्ठ नागरिक संवेदनशिलपणे पाहत आहेत, ही आपल्या संस्कृतीचा भाग असल्याचे सांगितले. ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाने पुढील पिढीचे भवितव्य घडत असते. त्यामुळे ज्येष्ठ हा दिवस कृतज्ञता व्यक्त करण्याचा आहे. यानिमित्ताने ज्येष्ठांच्या संपत्तीचे संरक्षण करणे, त्यांच्या आरोग्याच्या समस्या निकाली काढणे, वृद्धपकाळातील पेन्शनची प्रकरणे निकाली काढण्यात येतील.

तसेच आयुष्मान भारत कार्ड आणि महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ घेण्याचे त्यांनी आवाहन केले.श्री. जाधवर यांनी प्रास्ताविक केले. समन्वयक श्रीकृष्ण पखाले यांनी सूत्रसंचालन केले. जनसंपर्क अधिकारी मंगला देशमुख यांनी आभार मानले.



सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

गुरुवार दि. २ ऑक्टोंबर २०२५

शहर/ग्रामिण

# शेतकऱ्यांसाठी महाविस्तार AI विकसित

## चुकीच्या खतांचा वापर टळणार

### डिजिटल क्रांतीमुळे नफा वाढणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ अमरावती,**
शेतकऱ्यांना हवामान बदल, बाजारपेठेतील अस्थिरता, आणि माहितीच्या अभावामुळे अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. यावर उपाय म्हणून कृषी विभागाने महाविस्तार –ख हे अँप विकसित केले आहे. हे एक अत्याधुनिक अँप आहे. कृत्रिम बुद्धिमतेच्या साहाय्याने हे ॲप शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीशी संबंधित सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी एकाच ठिकाणी माहिती उपलब्ध करून देते. मराठी भाषेत उपलब्ध असलेले हे अँप शेतक–यांना रिअल टाइम माहिती, तज्ज्ञांचा सल्ला आणि आधुनिक शेती पध्दतींचे मार्गदर्शन करते. महाविस्तार –ख अँपमधील –ख चॅटबॉट शेतकऱ्यांच्या प्रश्नांना त्वरित उत्तरे देते. रिअल टाइम हवामान अंदाज स्थानिक पातळीवरील हवामान अंदाजामुळे शेतकरी पेरणी, कापणी आणि खतांचा वापर यांचे नियोजन करू शकतात. स्थानिक आणि राष्ट्रीय



बाजारपेठेतील पिकांचे भाव रिअल टाइममध्ये दाखवते. कृषि विभागाच्या विविध कृषी योजनांची माहिती. अनुदान, आणि विमा योजनांचे तपशील एकाच ठिकाणी मिळू शकतील. अँपमध्ये मराठीत व्हिडिओ उपलब्ध आहेत. ज्यात पिकांची लागवड, खतांचा वापर कापणी, आणि जैविक शेती याबाबत तपशीलवार मार्गदर्शन मिळेल. अँपमधील –ख तंत्रज्ञानमध्ये शेतकरी पिकांचे फोटो अपलोड करून पिकांवरील रोग आणि किडींचे निदान करून उपाय मिळवू शकतात.महाविस्तार –ख अँप शेतकऱ्यांचे जीवन सुसह्य बनवण्यासाठी अनेक फायदे घेऊन आले आहे. चुकीच्या खतांचा किंवा कीटकनाशकांचा वापर टाळून शेतकरी उत्पादन खर्च कमी करू शकतात. बाजारभाव माहिती आणि हवामान अंदाजामुळे शेतकरी योग्य वेळी पिकांची विक्री आणि नियोजन करू शकतात. यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते.गुगल प्ले स्टोअरवर जाऊन आजच महाविस्तार –ख अँप डाउनलोड करा आणि शेतीत डिजिटल कांतीचा भाग व्हा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.

# अतिवृष्टीमुळे सहकारी संस्थांच्या निवडणुका पुन्हा पुढे ढकलल्या

## आता ३१ ऑक्टोबरनंतर प्रक्रिया सुरू होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती–** अमरावतीसह राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका पुन्हा एकदा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे हा निर्णय घेण्यात आला असून, आता या निवडणुका ३१ ऑक्टोबरनंतरच घेतल्या जातील. यापूर्वी २० ऑगस्ट रोजीच्या अधिसूचनेनुसार, बहुतांश निवडणुकांना ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

सहकार व पणन मंत्रालयाने यासंदर्भात नवीन आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार, ज्या निवडणुका न्यायालयाच्या निर्देशानुसार होत आहेत



किंवा ज्यांमध्ये चिन्ह वाटप पूर्ण झाले आहे, तसेच संचालक मंडळाची निवड झाली असून केवळ अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा सभापती निवडायचा आहे, अशा निवडणुका पुढे सुरू ठेवता येतील. याव्यतिरिक्त, निधन किंवा राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या पदांसाठीची निवड प्रक्रियाही पुढे चालू ठेवण्यास परवानगी आहे. मात्र, नव्याने होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुका या आदेशाने थांबवण्यात आल्या आहेत.

सध्या अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी आणि पूरस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले असून, शेतकरी आणि शेतमजुरांची स्थिती दयनीय झाली आहे. या गंभीर परिस्थितीचा समाजातील इतर घटकांनाही फटका बसला आहे. याच कारणांमुळे निवडणुका एक महिन्यासाठी पुढे ढकलण्यात आल्याचे पणन मंत्रालयाचे अपर निबंधक तथा सहसचिव संतोष पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना पाठवलेल्या पत्रात नमूद केले आहे.

# जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत नांदगावपेठच्या मुलींचा डंका!

## वाशीम विभागीय स्पर्धेसाठी संघाची निवड – कॅरम व कुस्तीमध्येही गाजली कामगिरी

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२ नांदगाव पेठ–**क्रिडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत नुकत्याच झालेल्या जिल्हा क्रीडा अधिकारी, अमरावती आयोजित शालेय जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत नांदगावपेठ येथील जि.प. माध्यमिक शाळा व क. म. वि. च्या मुलींच्या कबड्डी संघाने प्रथम क्रमांक पटकावत अजिंक्यपद मिळवले. या ऐतिहासिक विजयामुळे या संघाची आता वाशीम येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.याआधी तालुकास्तरीय स्पर्धेतही याच मुलींच्या संघाने अजिंक्यपद पटकावले होते.

सातत्याने उत्कृष्ट खेळ करत जिल्हास्तरीय अजिंक्यपद मिळवणे ही ग्रामीण भागातील विद्यार्थिनींच्या कर्तृत्वाची मोठी शिदोरी आहे.संघाच्या या भव्य कामगिरीबद्दल शाळेचे प्राचार्य देवेंद्र ठाकरे, उपप्राचार्य सुनिल राऊत आणि क्रीडा मार्गदर्शक गजानन राणे यांनी



संघाचे अभिनंदन करत पुढील विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.केवळ कबड्डीच नव्हे, तर कॅरम व कुस्ती स्पर्धेतही शाळेच्या चार विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत विभागीय पातळीवर प्रवेश मिळवला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा हा बहुआयामी यशाचा ठसा खरोखरच कौतुकास्पद आहे. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या घवघवीत यशाबद्दल शिक्षक अशोक चाफले, ए. एम. बनसोडे, के. जे. शेख, उपरीकर, डांगे, व्ही. एम. गुरव, प्रणाली ढोणे, जे. टी. आझडे, कल्पना, वर्हेकर, माया बागडे, देवपल ब्राम्हण, यु. एस. घारड, डॉ. जयश्री इंगळे, ज्योती नारखेडे, आसीया शेख, चंदा इंगळे, स्वाती बोडाखे, प्रशांत बोर्डीकर, हेमंतकुमार यावले, जीवनमाला बोरकर, शितल अटाळकर, नितीन फाळके, नीरज दरोकर , उद्धव पांढरीकर , तेजस्विनी शेंडे, धनंजय देशमुख, प्रतिभा भुले, उमेश केने यांच्यासह स्थानिक सर्पंच कविता डांगे, ग्रामपंचायत अधिकारी हर्षदा बोंडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व समस्त गावकरी मंडळींनी संघाचे अभिनंदन केले.

# रोजगार निर्मिती कार्यक्रमातील कर्ज प्रकरणे डिसेंबरपर्यंत निकाली काढावीत–जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ अमरावती,**
मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम आणि प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात गावपातळीवर रोजगार उभारण्यासाठी बँकेमार्फत कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. याबाबतचे प्रस्ताव बँकांकडे पाठविण्यात येते. ही कर्ज प्रकरणे डिसेंबरपर्यंत निकाली काढावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले. जिल्हा नियोजन भवनात जिल्हास्तरीय बँकर्स समितीची बैठक पार पडली. यावेळी अग्रणी बँक व्यवस्थापक नरेश हेडाऊ, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी राहूल सातपुते, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निलेश निकम, खादी ग्रामोद्योगचे जिल्हा व्यवस्थापक प्रदिप चेचेरे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी जिल्ह्यातील बँकांकडून मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेचा आढावा घेतला. जिल्हा उद्योग केंद्र, खादी ग्रामोद्योग आणि कृषी विभागातर्फे उद्योग उभारण्यासाठी सहकार्य करण्यात येते. तसेच बँकांकडे कर्ज प्रकरणे दाखल करण्यात येतात. ही प्रकरणे नाकारताना संबंधित कार्यालयाला सूचना देण्यात यावी. प्रामुख्याने कागदपत्रांची पुर्तता करीत नसल्यास याबाबत माहिती देण्यात यावी.

विविध शासकीय यंत्रणांकडून बँकांना कर्ज प्रस्ताव पाठविण्यात येत आहे. मात्र सिबिल स्कोअर आणि इतर कारणांमुळे कर्ज मंजुरीचे प्रमाण कमी आहे. तसेच बँकांकडून कर्ज मंजूरीची गतीही कमी आहे. त्यामुळे येत्या डिसेंबरपर्यंत कर्ज



प्रकरणांबाबत बँकेच्या नियमाप्रमाणे निर्णय घेण्यात यावा. या प्रक्रियेसाठी मनुष्यबळ उपलब्ध होण्यासाठी इतर शाखांमधून काही कालावधीसाठी प्रयत्न करावेत. कोणत्याही परिस्थितीमध्ये कालमर्यादेचे पालन करावे, असे आवाहन केले. जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे सुमारे दोन लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीपोटी भरपाई शासनाकडून होणार आहे. शेतकऱ्यांना मिळणारी ही मदतीची रक्कम बँक खात्यात जमा होणार आहे. मात्र ही रक्कम परस्पर कर्ज खात्यात वळती होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. असे प्रकार झाल्यास कायदा व सुव्यवस्थेची समस्या निर्माण होण्याची शक्यता असल्याने असे प्रकार होणार नाहीत, याची प्रत्येक शाखेला सूचना देण्यात यावी, अशी सूचनाही त्यांनी यावेळी केली.यावेळी बँकनिहाय कर्ज मंजुरीचा आढावा घेण्यात आला. पी. आर. पोटे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जिल्ह्यातील रोजगाराच्या संधीबाबत तयार करण्यात आलेल्या पोर्टलचे सादरीकरण केले.

यामुळे निश्चित केलेल्या भागात कोणत्या रोजगाराच्या संधी आहेत, याबाबत माहिती मिळणार आहे. याचा लाभ बँकांना कर्ज प्रकरणे मंजूर करताना, तसेच उद्योग उभारण्यास इच्छुकांना होणार आहे.

# मोर्शी मतदारसंघात तीन पोलिस चौकी निर्मितीला गृहविभागाने दिली मान्यता

## आ. उमेश यावलकर यांच्या पाठपुराव्याला यश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती–** मोर्शी मोर्शी–वरुड तालुक्यातील पोलिसस्टेशन हद्दीतील गावांची संख्या पाहता तसेच वाढत्या लोकसंख्येचा व भौगोलिक अडचणीचा विचार करता कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मोर्शी विधानसभा मतदारसंघाचे आ. उमेश यावलकर यानी आमदार झाल्यापासून गृहमंत्रालयाकडे अतिरिक्त पोलिस चौकीच्या निर्मितीसाठी सतत पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्याला अखेर यश प्राप्त झाले असून मोर्शी पोलिसस्टेशन हद्दीतील हिवरखेड, वरूड पोलिसस्टेशन हद्दीतील राजुराबाजार व शेदुरजनाघाट पोलिसस्टेशन हद्दीतील पुसला येथे नव्याने पोलिस चौकी उभारण्याकरिता बारा शासन मान्यता देण्यात आली. या परिसरातील नागरिकांना आजपावेतो दहा ते किलोमीटरचे अंतर कापून पोलिसस्टेशन गाठावे लागत होते, ते आता त्यांच्याकरिता अधिक सोयीचे होणार आहे. त्यामुळे मोर्शी विधानसभा मतदारसंघातील नागरिकांनी आ. यावलकर यांचे आभार मानले आहे.वरूड व मोर्शी



या दोन पाच तालुक्यात एकूण पोलिसस्टेशन आहेत. यामध्ये मोर्शी, शिरखेड, वरूड, बेनोडा, शेदुरजनाघाट या मुख्य शहरांचा समावेश आहे. परंतु गेल्या कित्येक वर्षापासून मोर्शी पोलिसस्टेशन हद्दीतील हिवरखेड, वरूडमधील राजुराबाजार,शेंदूरजनाघाटमधील येथील पुसला ग्रामस्थांची अतिरिक्त पोलिस चौकीची मागणी धूळखात होती. स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार आ यावलकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे याबाबत सतत पाठपुरावा केला. त्यानंतर गृहविभागाने अतिरिक्त नव्याने उभारण्यात येणाऱ्या तीन पोलिस चौकीच्या निर्मितीकरिता मान्यता दिली. त्यामुळे फडणवीस व पालकमंत्री आ. यावलकर यांनी गृहमंत्री देवेंद्र चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार व्यक्त केले.

# जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीसाठी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**
जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सदस्य आरक्षण निश्चिती, सोडतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. यासाठी सोमवार, दि. ६ ऑक्टोबरपासून कार्यक्रम सुरू होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आरक्षण सोडतीचा कार्यक्रम होणार आहे. सदस्य आरक्षण निश्चिती, सोडतीचा कार्यक्रमानुसार जिल्हाधिकारी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती जागा निश्चितीसाठी प्रस्ताव तयार करून दि. ६ ऑक्टोबरपर्यंत विभागीय आयुक्तांकडे सादर करतील. दि. ८ ऑक्टोबरपर्यंत विभागीय आयुक्त अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता राखीव जागांच्या प्रस्तावास मान्यता देतील. दि. १० ऑक्टोबर रोजी आरक्षण सोडतीची सूचना अनु. जाती, अनु. जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग आणि सर्वसाधारण महिला प्रवर्गासह वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात येणार आहे. दि. १३ ऑक्टोबर रोजी आरक्षण सोडत काढणे यासाठी जिल्हाधिकारी जिल्हा परिषद



निवडणूक विभागासाठी, तर तहसीलदार पंचायत समिती निर्वाचक गणासाठी आरक्षण काढतील. दि. १४ ऑक्टोबर रोजी प्रारूप आरक्षणाची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येणार आहे. दि. १४ ते १७ ऑक्टोबर दरम्यान जिल्हाधिकारी यांच्याकडे जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील प्रारूप आरक्षणावर हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी आहे. दि. २७ ऑक्टोबर पर्यंत प्राप्त प्रारूप आरक्षणावरील हरकती व सूचनांच्या आधारे अभिप्रायासह गोषवारा विभागीय आयुक्त यांना सादर करण्यात येईल. दि. ३१ ऑक्टोबर पर्यंत प्रारूप आरक्षणावर प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करून आरक्षण अंतिम करण्यात येईल. त्यानंतर ३ नोव्हेंबर रोजी अंतिम आरक्षण शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येणार आहे, असे उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार यांनी कळविले आहे.–

# स्वच्छ भारतासाठी विद्यार्थ्यांची एकजूट : अमरावती महानगरपालिकेत 'विद्यार्थी संसद' उपक्रम उत्साहात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती–**
अमरावती : अमरावती महानगरपालिकेतर्फे मनपा आयुक्त तथा प्रशासक सौम्या शर्मा–चांडक आणि अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ भारत अभियान–स्वच्छ सर्वेक्षण २०२५ अंतर्गत एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला. दिनांक ३० सप्टेंबर २०२५ रोजी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे विद्यार्थी संसद या संसदीय चर्चेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचा मुख्य विषय स्वच्छ भारत मिशन होता. सुमारे ७० विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी यात उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी आपल्या प्रभावी भाषणातून स्वच्छतेबाबत ठोस मते, विधायक सूचना आणि अभिनव कल्पना मांडल्या. शहर स्वच्छ, सुंदर आणि निरोगी ठेवण्यासाठी नागरिकांनी एकत्र येऊन योगदान द्यावे, असा ठाम संदेश त्यांच्या वक्तृत्वातून देण्यात आला.

या चर्चेमध्ये –

प्रथम क्रमांक : प्रभव रविंद्र कळगे

द्वितीय क्रमांक : तमन्ना नाज अब्दुल रशीद

तृतीय क्रमांक : शेख इमरान शेख रशीद

यांनी आपले कौशल्य दाखवत यश संपादन केले.

या उपक्रमासाठी परीक्षक म्हणून प्रोफेसर डॉ. नितीन चव्हाळे आणि प्रो./डव्होकेट योगेश सोळंके उपस्थित होते. लोकसभा स्पीकर इंजिनियर मिलिंद कहाले, स्वच्छ भारत अभियान शहर समन्वयक श्वेता बोके व खएउ टीम यांची विशेष उपस्थिती विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरली.

अशा अभिनव उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता वाढते, पर्यावरण संवर्धनाची जाणीव दृढ होते आणि जबाबदार नागरिकत्वाचे भान बळकट होते. स्वच्छ सर्वेक्षण २०२५ मध्ये नागरिकांचा सहभाग वाढविणे आणि स्वच्छतेचे संस्कार लहानपणापासून रुजविणे या उद्देशाने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त व परिणामकारक ठरला.



# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमाला जाणार नाही; कुठेही गेलो तरी आंबेडकरी विचारच मांडणार - कमलताई गवई



तरीही माझ्यावर आणि स्मृतिशेष दादासाहेब गवई यांच्यावर ज्या पध्दतीने वस्तुस्थितीला धरुन नसलेली टीका झाली व अजुनही होत आहे. माझे जीवन तर आंबेडकरी चळवळीला आणि विपश्यनेला वाहून घेतले आहे. या एका कार्यक्रमामुळे ते कलंकित करण्याचा प्रयत्न होत असल्याने मी व्यथीत व दुःखी झाली आहे. माझे वय ८४ असून माझी प्रकृती बरी नसल्याने डॉक्टराच्या सल्लयाने सद्या उपचार घेत आहे. कुठेतरी थांबले पाहीजे या कारणाने ०५ ऑक्टोबरच्या कार्यक्रमात जाणार नाही एवढे खरे !...आता विसाव्याचे क्षण! भरुन येते मन, भरुन येते मन.

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या येत्या ५ ऑक्टोबरला अमरावतीत होणाऱ्या विजयादशमी सोहळयाला सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या मातोश्री कमलताई गवई यांना निमंत्रित करण्यात आल्यानंतर उद्भवलेल्या वादावर खुद्द कमलताईंनी अखेर प्रथमच भाष्य केले आहे. त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्पष्ट केले की, आपले वय ८४ वर्षे असून प्रकृती बरी नसल्याने आणि सध्या डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार उपचार सुरू असल्याने त्या ५ ऑक्टोबरच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार नाहीत.

**कमलाताई गवईंनी पत्रात काय म्हटले?**

कमलाताई त्यांच्या पत्रात म्हणाल्या, दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२५ च्या कार्यक्रमाच्या निमित्ताने एक पत्र समाजमाध्यमावर व वर्तमान पत्रामध्ये प्रकाशित झाले आहे. ते पत्र आमच्या कुटुंबाशी स्नेह असलेल्या कुणीतरी समाज बांधवाने लिहिले असावे. त्याबद्दल मला जास्त बोलायचे नाही. दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२५ ला होणाऱ्या एका कार्यक्रमाची तारीख घेण्यासाठी माझ्या ओळखीतले काही लोक आले होते. आमच्या सर्वांप्रती मंगलभावना व मंगलकामना असतात. त्यामुळे आम्ही सर्वांचे स्वागतच करतो. आमचा मैत्रीभाव व बंधूभाव हा सर्वांप्रती आहे.

परंतु या कार्यक्रमाचे वृत्त प्रसारित झाल्याबरोबर अनेकांनी माझ्यावरच नव्हे तर स्मृतिशेष दादासाहेब गवई यांच्यावर सुध्दा टीकाच नव्हे तर दोषारोपण केले. आम्ही पण आंबेडकरी विचाराला वाहून घेतले आहे. दादासाहेब गवई यांचे जीवन तर आंबेडकरी चळवळीलाच समर्पित होते. दुसऱ्या विचारधारेच्या मंचावर आपले विचार मांडणेही गरजेचे असते. यासाठीही धाडस लागतं./सिंहाचं काळीज लागतं. दादासाहेब जाणून बुजून अशा विरोधी मंचावरती जायचे तेथे वंचितांचे प्रशन मांडायचे हा त्यांच्या धोरणाचा भाग होता. आपल्याशी असहमत असलेल्यांनाही ते आपली भूमिका ऐकवावी असे त्यांचे मत होते. ते संघाच्या कार्यक्रमात गेले पण त्यांनी हिंदुत्व कधीही स्विकारले नाही. त्यांनी समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यावरच भाषण केले. आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संविधानिक विचारांची मांडणी केली.

मी त्या विचार मंचावर गेले असते तरीही आंबेडकरी विचार आणि विपश्यनाच मांडली असती. स्मृतिशेष दादासाहेब याच विचाराने त्या विचारधारेच्या मंचावर गेले आणि तिथे त्यांनी आंबेडकरी विचारच मांडले. आपण कुठेही गेलो तरी आंबेडकरी विचारच मांडणार. ते आपण शेवटच्या श्वासापर्यंत सोडणार नाही. हा आपल्या संस्काराचा भाग आहे.

# दसऱ्यानिमित्त सोने-चांदी खरेदीला उधाण

## दर वाढले, तरी गर्दी दरवर्षीप्रमाणे कायम

## अमरावतीच्या बाजारपेठेत गर्दीच गर्दी





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या दसऱ्याच्या मुहूर्तावर पुणेकरांनी सराफा बाजारात सोने-चांदी खरेदीसाठी गर्दी केल्याचे चित्र पहायला मिळाले, यंदा दसऱ्याच्या मुहूर्तावर सोने-चांदीचे दर आकाशाला भिडले आहेत, मात्र असे असतानाही सोने खरेदीसाठी अमरावतीकरांची गर्दी दरवर्षीप्रमाणेच कायम असल्याचेही दिसत आहे.

शहरातील सराफा बाजार सह अन्य दुकानां मध्ये सोने चांदीच्या दुकानांमध्ये शुभ मुहूर्तावर सोने-चांदीची खरेदी करण्यासाठी पुणेकरांनी कुटूंबीयांसह गर्दी केली आहे. अनेकांनी तर घटस्थापनेच्या दिवसापासून सोन्याच्या प्रसिद्ध दुकानांमध्ये सोने खरेदीसाठी अगोदरच बुकिंग करून ठेवले आहे. ते बुकिंग केलेले आज गुरुवारी (दि.०२) सोने-चांदी दसऱ्याच्या दिवशी साडेतीन मुहूर्तावर घरी नेण्याची तयारी अनेक नागरिकांनी करून ठेवली आहे.

सोने-चांदी खरेदी असो अथवा वाहन खरेदी करायची असेल, तर अमरावतीकर शुभ मुहूर्तावरच खरेदी करण्याचा प्रयत्न करतात. तशीच काहीशी प्रथा अनेकांच्या कुटुंबात पिढीजातच आपोआप तयार झाली आहे. या प्रथेप्रमाणे दसरा, दिवाळी पाडवा, गुढीपाडवा आणि अक्षय्य तृतीयेचा मुहूर्त, हे सर्व मुहूर्त साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्यामुळे अमरावतीकर या मुहूर्तावर आवर्जून सोने-चांदीची खरेदी करतात. त्यामुळे बहुतांश अमरावतीकरांनी यंदा दसऱ्याच्या मुहूर्तावर सोने-चांदीची खरेदी केली.

# 'तुझेच धम्मचक्र हे फिरे जगावरी', दीक्षाभूमीवर लोटला भीमसागर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२नागपूर**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या धम्मक्रांतीचा उत्सव साजरा करण्यासाठी लाखोच्या संख्येत भीम अनुयायी नागपूरच्या दीक्षाभूमीवर आले. 'जयभीम'च्या जयघोषासह दीक्षाभूमीकडे जाणारे रस्ते अनुयायांनी गजबजले. स्थानिक प्रशासनानेही अनुयायांच्या सोयीसाठी तयारी पूर्ण करण्याचे प्रयत्न केले.

डॉ.आंबेडकर यांनी १९५६ साली दीक्षाभूमीवर पाच लाख अनुयायांच्या उपस्थित बौद्ध धम्माची दीक्षा घेतली होती. त्या ऐतिहासिक सोहळ्याचा उत्सव साजरा करण्यासाठी दरवर्षी लाखोंच्या संख्येत अनुयायी दीक्षाभूमीवर येतात. यंदा अनुयायांची संख्येत भर पडणार असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. मागील काही वर्षांपासून दीक्षाभूमीवर दक्षिण भारतातील राज्य कर्नाटक, तेलंगाणा, आंध्रप्रदेश, तमिळनाडू राज्यातूनही मोठ्या संख्येत अनुयायी येत आहेत. याशिवाय उत्तरप्रदेश, मध्यप्रदेशमधील अनुयायांसह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातूनही मोठ्या प्रमाणात अनुयायी येत असतात. या पार्श्वभूमीवर स्थानिक प्रशासनाने मूलभूत सुविधा पुरविण्याबाबत प्रयत्न केले. पावसामुळे दीक्षाभूमी परिसराची झालेली दुरवस्था सुधारण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून करण्यात आला, मात्र हे प्रयत्न पुरेसे ठरणार का याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे.

# सायबर गुन्ह्यांत महाराष्ट्र अव्वल, राष्ट्रीय गुन्हे नोंदणीच्या ताज्या अहवालात दखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ नागपूर**

देशभरात २०२३ या वर्षांत ६२.४१ लाख दखलपात्र गुन्हे नोंदवले गेले. यापैकी ३७.६३ लाख गुन्हे भारतीय दंड संहिते अंतर्गत तर २४.७८ लाख गुन्हे हे विशेष स्थानिक कायद्यांतर्गत नोंदवले गेले. २०२२ च्या तुलनेत एकूण सरासरी गुन्ह्यांत ७.२% वाढ झाली. राज्यातील गुन्हेगारीचा दर लाख लोकसंख्ये मागे ४२२.२ वरून ४४८.३ वर वाढला.

राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या ताज्या अहवालानुसार देशातील सायबर गुन्ह्यांच्या सर्वाधिक नोंदीत महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आला. यातील बहुतांश प्रकरणे आर्थिक फसवणूकीशी निगडीत आहेत. सायबर गुन्ह्यांची एकूण ८६ हजार ४२० प्रकरणे राज्यात नोंदवली गेली. यात ३१ टक्क्यांनी वाढ झाली. यापैकी ५९,५२६ (६८.९) टक्के प्रकरणे ही आर्थिक फसवणूकीशी निगडीत होती. सायबर गुन्ह्यांमध्ये २.३ टक्के प्रकरणांत अश्लिल साहित्य प्रसारणाचे कारण आढळले.

लैंगिक शोषणाची ४,१९९ प्रकरणे पोलीस डायरीवर नोंद झाली. यातील ३ हजार ३२६ सायबर गुन्हे खंडणी होती. सायबर आर्थिक फसवणूकीशी निगडीत प्रकरणांत ७० टक्के प्रकरणे ही युपीआय, बँकिंग, क्रेडिट कार्डशी निगडीत आढळली.

देशातील मुंबई, पुणे, नागपूर, दिल्ली, कोलकाता, हैदराबाद, बेंगळुरू, चेन्नई, सारख्या १९ महानगरांमध्ये एकूण ९ लाख ४४ हजार २९१ दखलपात्र गुन्हे नोंदवले गेले. त्यात ६ लाख ६७ हजार ३५१ प्रकरणे भारतीय दंड संहिता आणि २ लाख ७६,९४० स्थानिक कायद्यांतर्गत नोंद झाले. २०२२ च्या तुलनेत यात १०.६% वाढ नोंद झाली आहे.

# अतिवृष्टीग्रस्तांसाठी मदतीचा हातः पी.आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपचा मुख्यमंत्री सहाय्यता निधीस २५ लाखांचा योगदान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

महाराष्ट्रातील अतिवृष्टीग्रस्त भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी पी.आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप, अमरावती यांच्यातर्फे मुख्यमंत्री सहाय्यता निधीत २५,००,०००/- (पंचवीस लाख रुपये) चा धनादेश सुपूर्द करण्यात आला. आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे हा धनादेश संस्थेच्या प्रतिनिधींनी दिला.यासोबतच लवकरच आठ ट्रक धान्य आणि घरगुती आवश्यक वस्तू अतिवृष्टी प्रभावित जिल्ह्यांतील जिल्हाधिकाऱ्यांना सुपूर्द करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.संस्थेचे अध्यक्ष माजी राज्यमंत्री मा. श्री. प्रविण पोटे पाटील व उपाध्यक्ष श्री. श्रेयशदादा पोटे पाटील हे संकटाच्या काळात नेहमीच समाजाप्रती आपली बांधिलकी जपत सक्रिय राहतात. या मदतीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे आभार मानले.यावेळी प्रविण पोटे पाटील, श्रेयसदादा पोटे पाटील, किरणताई महल्ले, शिवराय कुलकर्णी, दिनेश सूर्यवंशी, किरण पातूरकर, चेतन पवार व दीपक पोहेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# धनगरांच्या बाजूने की आदिवासींच्या? -महानंदाताई टेकाम यांचा माजी आमदार राजकुमार पटेल यांना थेट सवाल!



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२परतवाडा**

परतवाडा येथे नुकत्याच पार पडलेल्या आदिवासी आरक्षण बचाव जनआक्रोश मोर्चामध्ये मोठ्या संख्येने आदिवासी बांधव सहभागी झाले. बंजारा, धनगर आणि इतर ४२ जातींचा आदिवासी समाजात समावेश होऊ नये, या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात आला होता.

या मोर्चाच्या व्यासपीठावर बोलताना ट्रायबल वुमेन्स फोरम महाराष्ट्र राज्यच्या राज्य संघटक व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या महानंदाताई भिमरावजी टेकाम यांनी थेट मेळघाटचे माजी आमदार राजकुमार पटेल यांना उद्देशून प्रश्न उपस्थित केला - आपण सत्तेत असताना माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना १ नोव्हेंबर २०२३ रोजी धनगर व मराठा समाजासाठी विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी पत्राद्वारे केली होती. मग आज तुम्ही धनगर समाजाच्या बाजूने आहात की आदिवासी समाजाच्या?

टेकाम यांचा हा थेट सवाल मोर्चात उपस्थित आदिवासी बांधवांमध्ये गदारोळ उडवणारा ठरला. माजी आमदारांच्या भूमिकेमुळे आदिवासी समाजात नाराजीचं वातावरण पसरल्याचं स्पष्टपणे जाणवत होतं. आदिवासी आरक्षणावर उपभोग घेणाऱ्या नेत्यांना जबाबदारीने आणि स्पष्ट भूमिका घेणं गरजेचं आहे. महिलांनी आवाज उठवला तर त्यांना गप्प का बसवलं जातं? असा सवालही चर्चेचा विषय ठरला.

मोर्चामध्ये मेळघाटातील आदिवासी बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आदिवासी कृती समन्वय समिती व ऑल इंडिया कर्मचारी संघटना यांच्या वतीने २५ ते ३० वाहने भरून कार्यकर्त्यांना आणण्यात आले. मात्र, यामध्ये स्थानिक कार्यकर्त्यांना व्यासपीठावर बोलण्याची संधी न मिळाल्यामुळे तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

विशेष म्हणजे, आदिवासी भूमिकेविरोधात बोलणाऱ्यांना व्यासपीठावर बोलावलं गेलं, तर खऱ्या अर्थाने संघर्ष करणाऱ्या कार्यकर्त्यांना डावलण्यात आलं. यामुळे आदिवासी समाजात संभ्रम आणि असंतोष वाढला आहे.

व्यासपीठावर माजी विभागीय उपायुक्त रमेश मावसकर, माजी सभापती दयाराम काळे, आदिवासी कृती समितीचे अध्यक्ष मा. पटेल साहेब, रामगोपाल मावसकर, दिलीप जावरकर सर, जयस महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष संदीपभाऊ तोटे, महाराष्ट्र जनक्रांती सेना अध्यक्ष मन्नालाल दारसिंबे आदी मान्यवर उपस्थित होते.




आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
विदर्भ प्रजासत्ताक
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत